**वाचले :**

१. कारणे दाखवा नोटीस क्र.डक्षेका/प्रशा/०१/कावि/५५०/२०२४ दि.२५/०६/२०२४

२. क्षेत्रीय अधिकारी, ड क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.डक्षेका/प्रशा/०१/कावि/५५४/२०२४ दि.२५/०६/२०२४.

३. मा.आयुक्त सो. यांचेकडील दिनांक.२७/०९/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८.सामान्य प्रशासन विभाग,
क्र.साप्रवि/९/कावि/९८२/२०२४
दिनांक:- ०६ /१२ /२०२४

विषय : विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत...
श्री.नाईकवाडे अनिल भिमराव,शिपाई

आदेश,

ज्याअर्थी, श्री.नाईकवाडे अनिल भिमराव, हे पिंपरी चिंचवड **ड क्षेत्रीय कार्यालयात "शिपाई" या गट ड** च्या पदावर,कार्यरत आहेत. कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने त्यांच्याकडे कार्यकारी अभियंता यांचे केबिनचे कामकाज व इतर तदअनुंषगिक कामकाज सोपविण्यात आलेले आहे. प्रत्येक कर्मचा-यांने शिस्तीचे व नियमाचे पालन करणे अभिप्रेत असून कार्यालयीन वातावरण दुषित होणार नाही. याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापी, श्री. नाईकवाडे हे कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्याशी वाद घालणे,महिला कर्मचा-यांना त्रास देणे,वरिष्ठांशी अरेरावीच्या भाषेत दमदाटी व शिविगाळ करणे, नागरीकांकडून वारंवार पैशाची मागणी करणे,कार्यालयीन शिस्तीचे वारंवार उल्लंघन करणे,प्रकरणी वाचले क्र.१ अन्वये त्यांचे बेशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस देवूनही त्यांचे एकंदरीत वागण्यामध्ये सुधारणा होत नसून, ड क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागातील वातावरण मलिन होवून,कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण झाल्याची बाब क्षेत्रीय अधिकारी ड क्षेत्रीय कार्यालय यांनी वाचले क्र.२ च्या अहवालाव्दारे निदर्शनास आणून दिलेली आहे.

ज्याअर्थी,श्री. नाईकवाडे अनिल भिमराव, शिपाई, हे कार्यालयीन आवक झालेले गोपनीय टपालाची चाचपणी करणे, सहकर्मचारी यांचेशी उध्दट वर्तन करून,कार्यालयात दशहत निर्माण करणे,नशापान करून, शिवीगाळ करून मानसिक त्रास देणे अशा स्वरूपाचे गैरवर्तनाने,कार्यालयीन वातावरण दूषित होवून कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होत असल्याची बाब व त्याची बदली करणेबाबत ड क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचा-यांनी दि.१९/०६/२०२४ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.त्यांचे उदधृत गैरवर्तन कार्यालयीन शिस्तीवर प्रतिकुल परिणाम करणारे अत्यंत बेजबाबदारपणा, कर्तव्याप्रती सचोटी व कर्तव्य तत्परता न ठेवणारे कर्तव्यात कसुर व शिस्त / नियमाचे भंग करणारे असून त्यांचे उदधृत गैरवर्तनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३(१)(एक)(दोन)(तीन) मधील तरतुदीचा भंग होत असल्याचे निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

त्याअर्थी, मी,आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, विभागप्रमुख क्षेत्रीय अधिकारी, ड क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील प्राप्त अभिप्रायुक्त अहवाल, ड क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागातील कर्मचा-यांनी दिलेले निवेदन विचारात घेता, श्री. नाईकवाडे अनिल भिमराव, शिपाई यांनी त्यांना नेमुण दिलेले कर्तव्यात नितांत सचोटी, व कर्तव्यपरायणता न ठेवल्याने हेतु पुरस्सर सहकर्मचा-यांशी गैरवर्तन करून स्थापत्य विषयक

कामकाजात अडथळा निर्माण केल्याने त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करणेस प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे. सदर आदेशाची नोंद त्यांच्या सेवा नोंद पुस्तकात घेण्यात यावी.

स्थापना ११/१०/८२ पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८.

प्रति,
श्री. नाईकवाडे अनिल भिमराव, शिपाई.
प्रत,
१. खातेनिहाय चौकशी कक्ष
२. सामान्य प्रशासन टेबल क्र ५, १०, १४,२२, सामान्य प्रशासन संगणक कक्ष, सेवाज्येष्ठता कक्ष
२/-योग्य त्या नोंदीकामी
३. ड क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य.
२/- प्रस्तुत आदेश संबंधितांस बजाविण्यात येवून त्याची पोहोच सत्वर पाठविणेत यावी. तसेच विभागीय चौकशीकामी १५ दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करणेत यावे. प्रकरणी विलंब झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (क) चे अर्थांतर्गत तरतुदीनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून नियमाधिन कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.
४. संबंधित विभाग – स्थापत्य मुख्य कार्यालय.

D:\NEW FOLDER\SK\SS\2024\नाईकवाडे अनिल भिमराव.DOC